# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३३ वे अंक पहिला पृष्ठे ०९ जानेवारी २०२४ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ साठ्ये महाविद्यालयात 'माध्यम महोत्सव' मोठ्या दिमाखात साजरा

पान ०३ 'MONEYSMART'

पान ०६ The Land of Unicorns

पान ०७ इस्त्रोचा 'स्टेलार' परफॉर्मन्स !

पान ०३ गौरी पाठारे यांची 'गानसरस्वती' पुरस्कारासाठी निवड




# २२ व्या पार्ले महोत्सवाचे शानदार आयोजन

सलग २१ वर्षे सुरू असलेल्या 'पार्ले महोत्सव' ची मालिका अखंड सुरू ठेवत ह्याही वर्षी २२ वा पार्ले महोत्सव मोठ्या दिमाखात साजर झाला. आमदार पराग अळवणी ह्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित विलेपार्ले कल्चरल सेंटर ह्या धर्मादाय आयुक्त कार्यालयातर्गत नोंदणीकृत सामाजिक संस्थेतर्फे सदर महोत्सवाचे भव्य आयोजन वामन मंगेश दुभाषी मैदान व साठये महाविदयालयात करण्यात आले होते.



कबड्डी, व्हॉलीबॉल, बॉक्स क्रिकेट, शरीर सौष्ठव, चित्रकला, बुद्धीबळ, होम मिनिस्टर, ओव्हर आर्म क्रिकेट, हस्ताक्षर, मेहंदी, रांगोळी, ज्येष्ठ नागरिक इ. स्पर्धांमधून सुमारे १५ हजारहून अधिक स्पर्धकांनी ह्या सात दिवसीय महोत्सवामध्ये सहभाग घेतला. 'वीरा ग्रुप' ने प्रमुख प्रायोजिकत्व स्विकारलेल्या ह्या वर्षीच्या महोत्सवाला 'अर्काडे ग्रुप' 'झी इन्फ्रा' 'युनिव्हर्सल ग्रुप' आदिंनी देखील महत्त्वपूर्ण सहयोग दिला.

मुंबई उपनगराचे पालकमंत्री मा. श्री. मंगलप्रभात लोढा ह्यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. महोत्सव काळात खासदार पूनम महाजन, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबई भा. ज. पा. चे अध्यक्ष ॲड. आमदार आशिष शेलार हयांसहीत साहित्य, नाट्य सामाजिक व अभिनय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडापटुंची विशेष उपस्थिती लाभली.

महोत्सवात सहभागी सर्व स्पर्धाकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले तर विजयी स्पर्धक व संघ ह्यांना चषक, मेडल्स व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. केवळ मुंबईपुरता मर्यादित न राहिलेल्या ह्या महोत्सवात संपूर्ण देशातून सहभाग घेण्यासाठी संघ व स्पर्धक येतात हीच ह्या महोत्सवाची यशस्वीता ठरते.

'दर वर्षी प्रगतीचे एक एक पाऊल पुढे टाकत मार्गक्रमण करीत असलेल्या ह्या महोत्सवाच्या घवघवीत यशाचे संपूर्ण श्रेय हे कार्यकर्त्यांचे निरापेक्ष योगदान, प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि उद्देशाला महत्व देत खंबीरपणे पाठीशी उभे रहाणारे प्रायोजक ह्या त्रिसूत्रीला जातं.' असं निखळ प्रतिपादन महोत्सवाचे जनक पराग अळवणी ह्यांनी करीत २३ व्या महोत्सवाला अधिक उत्तुंग करण्याचा मानस बोलून दाखविला.






## संपादकीय

हे नववर्ष सर्व पार्लेकरांना आनंदाचे व समृद्धीचे जावो ! वर्षातील पहिलाच अंक थोडा उशिरानेच प्रकाशित होतो आहे त्याबद्दल प्रथम दिलगिरी व्यक्त करतो.

कसे असेल हे वर्ष ? वर्षाच्या सुरवातीलाच सर्व भारतीय ज्याची वर्षोनुवर्षे आतुरतेने वाट पाहात होते तो अयोध्येमधील राम मंदिरातील रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा व्यवस्थित पार पडला हा एक शुभशकूनच म्हटला पाहिजे. भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेल्या राम आणि कृष्ण ह्यांनीच हि महान संस्कृती टिकवली व उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत अचाट वैविध्य असलेल्या आपल्या देशाला आज एकत्र गुंफून ठेवले आहे ह्यात शंका नाही. राम मंदिराच्या भव्य पुनर्बांधणीत श्रद्धेबरोबरच एक व्यावसायिक गणित सुद्धा आहे. गोव्यात दरवर्षी ७० ते ८० लाख पर्यटक येतात. काश्मीर मध्ये २०२३ साली सर्वात जास्त म्हणजे २.२५ कोटी पर्यटक आले. अयोध्येतील पर्यटकांचा आकडा ह्यापेक्षा कितीतरी जास्त असेल असा प्राथमिक अंदाज आहे. ह्यामुळे केवळ अयोध्येंच्याच नव्हे तर संपूर्ण उत्तर प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला बळ मिळेल अशी अपेक्षा आहे.

तसे बघितले तर २०२४ हे वर्ष खूप धामधुमीचे जाणार आहे. एप्रिल मध्ये सार्वत्रिक निवडणूका, त्याच वेळी किंवा त्यानंतर राज्यातील विधानसभा निवडणुका आणि हो, किमान दोन वर्षे प्रलंबित असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका सुद्धा ह्याच वर्षी अपेक्षित आहेत. ज्याप्रमाणे करोडो लोकांची श्रद्धा राम मंदिर बांधु शकते त्याच प्रमाणे करोडो लोकांचे एक मत योग्य व कार्यक्षम सरकार निवडून देऊ शकते. भारतीय मतदाराच्या प्रगल्भतेचे नेहमीच कौतुक केले जाते. ह्यावेळीही तो अशीच प्रगल्भता दाखवेल अशी आशा करायला काहीच हरकत नाही.

ह्या वर्षी थंडी पडणारच नाही कि काय असे वाटत असतानाच पार्ल्यात गेले काही दिवस चक्क थोडी थोडी थंडी जाणवू लागली आहे. अर्थात नाशिक पुण्याचे लोक पार्ल्याच्या ‘थंडी’ला मनसोक्त हसतात व ‘कम्बख्त, तूने पी ही नही’ असाच एकूण भाव त्यांच्या चेहेऱ्यावर असतो. कोणी काहीही म्हणोत, आम्ही आमच्या शाली, मफलर, स्वेटर लगेच बाहेर काढणार, नाहीतर त्यांना हवा तरी कधी लागणार ? होय की नाही हो काका ?

पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# साठ्ये महाविद्यालयात ‘माध्यम महोत्सव’ मोठ्या दिमाखात साजरा

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी साठ्ये महाविद्यालयाच्या माध्यम विभागातर्फे आयोजित ‘माध्यम महोत्सव’ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गेली ११ वर्षे विभागातर्फे या महोत्सवाचा दरवर्षी नव्या संकल्पनेसह आयोजन होत असतं. यंदाचा माध्यम महोत्सव ‘भारतीय संस्कृती : जतन



समृध्दीचे, वारसा परंपरेचा’ या संकल्पनेवर आधारित होता.याच पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाचा पुरातत्व विभाग आणि साठ्ये महाविद्यालयाचा प्राचीन भारतीय संस्कृती विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १५,१६ आणि १७ डिसेंबर रोजी साजरा होणाऱ्या या महोत्वसाचे उदघाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता जोशी-सराफ यांच्या हस्ते करण्यात आले. ढोलताशाच्या गजरात मान्यवारांचे आगमन झाले.

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रा. रश्मी वारंग यांनी केले तर प्रास्ताविक प्राचार्य डॉ. माधव राजवाडे



यांनी केले. उत्सवांतर्गत साजऱ्या होणाऱ्या इव्हेंटसबद्दल महाविद्यालयाची भूमिका त्यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडली. उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय नेरकर यांनी ख्यातनाम अभिनेत्री निवेदिता जोशी यांचा परिचय करून देत असताना अभिनय क्षेत्रातली त्यांची वाटचाल आणि सोबत त्यांचा युट्युब चॅनेलद्वारे नवीन माध्यमांवर असलेला यशस्वी वावर विशेषत्वाने नमूद केली.

माध्यम विभाग प्रमुख गजेंद्र देवडा यांनी माध्यम महोत्सवामागची भूमिका विशद केली. विविध संकल्पनांवर विद्यार्थी जेव्हा महाविद्यालयीन जीवनात काम करतात त्याचा उपयोग त्यांना व्यावसायिक जीवनात होतो हे माजी विद्यार्थ्यांचे दाखले देत सांगितले तर प्राचीन भारताची समृद्धता तरुणांपार्यंत पोहोचणे आवश्यक आहे त्यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील असतो आणि अनेक गोष्टी समोर आणण्यासाठी महाविद्यालय अशा प्रदर्शन आणि संशोधनाला प्रोत्साहन देत असते अशा भावना प्राचीन भारतीय संस्कृती



विभागाचे विभागप्रमुख डॉ. सूरज पंडित यांनी व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना निवेदिता जोशी-सराफ यांनी तरुणाईच्या उत्साहाचे कौतुक केले. हाती घेतलेलं काम करताना आत्मीयतेने केले पाहिजे तर त्याला तुम्ही न्याय देऊ शकता असा संदेश त्यांनी दिला. आजच्या तरुणाईमध्ये प्रचंड ऊर्जा आहे; पण सोबत या तंत्रज्ञानासोबत मोठा लढा त्यांना द्यायचा आहे. या सद्यपरिस्थितीची देखील जाणीव त्यांनी करून दिली. विद्यार्थ्यांच्या उस्फुर्त प्रश्नांना त्यांनी दिलखुलासपणे उत्तर देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या उदघाटन सोहळ्याचे आभार प्रदर्शन उपप्राचार्या श्रीमती प्रमोदिनी सावंत यांनी केले.

या महोत्सवाच्या माध्यमातून विविध राज्यांतील संस्कृतीचे प्रदर्शन केले गेले. तरुणाईला आकर्षित करण्यासाठी या महोत्सवात इन्फोटेनमेंट स्वरुपातील खेळांचे आयोजन विद्यार्थ्यांद्वारे केले गेले होते. या खेळांमध्ये अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. महोत्सवातविविध राज्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खाद्यपदार्थांचे स्टॉल्सचेही प्रदर्शन केले होते.

प्राचीन भारतीय संस्कृतिक प्रदर्शनात अनेकविध पुरातत्वीय वस्तूंची मांडणी केली




होती. भारतीय उपखंडातील काश्मीर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते आसाममधिल विविध प्रदेशातील प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलाच्या ठश्याची प्रतिकृती प्रदर्शनस्थळी ठेवली होती. चौल येथिल सुंदर वराह शिल्प, हडप्पा कालीन खापरे, प्राचीन नाणी, विविध हस्तलिखीते, प्राचीन आभूषयांचे नमुने, अश्मयुगिन हत्यारे, प्राचीन शिल्पे, ताम्रपत्र, शिलालेख अशा अनेक पुरावस्तुंचा यात समावेश होता. मुंबई भूगर्भातील खंडकांचे नमुने, जीवाश्म, खनिजे अश्या विविध गोष्टी प्रदर्शनात मांडल्या होत्या. पारंपरिक खेळ सुद्धा ह्या प्रदर्शनाचे भाग असून हे खेळ प्रत्यक्ष अनुभवायला मिळणार होते.

या महोत्सवाला अभिनेता आयुष संजीव आणि इन्स्टाग्राम इन्फ्लुन्सर शंतनू रांगणेकर यांनी सदिच्छा भेट दिली.

या महोत्सवाच्या यशासाठी महाविद्यालयाचे सांस्कृतिक समन्वयक डॉ. चेतन भोसले,रसिका सावंत, नारायण परब, गणेश आचवल, स्मिता जैन, सीमा केदारे, राधा सबनीस, निशिगंधा परळेकर इत्यादी प्राध्यापक मंडळींच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.

# 'MONEYSMART'

**सप्रेम नमस्ते! या नववर्षात आपण आर्थिक विषयाच्या विविध अंगांना स्पर्श करतील असे वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तिंसाठी माहितीपूर्ण लघुलेख प्रसिद्ध करणार आहोत. पार्ल्यातील निवृत्त बँकर व विविध आर्थिक विषयांचे संदर्भातील प्रशिक्षक असलेले श्री. प्रकाश जोशी या सदराचे लिखाण करणार आहेत. ते उल्लेख करणार असलेल्या पाच वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तीच्या संदर्भातील आर्थिक विषयक गरजा, आशा, अपेक्षा काहीश्या वेगवेगळ्या असू शकतात, त्यामुळे आपण पुढे प्रसिद्ध होणाऱ्या लघुलेखातून याचे भान ठेवण्याचा प्रयत्न करणार आहोत. लवकरच असे विविध आर्थिक विषयावरील लघुलेख 'MONEY SMART' या शिर्षकाखाली प्रसिद्ध करणार आहोत, त्यावरील आपल्या प्रतिक्रिया/ सूचना आम्हाला जरुर पाठवा. मात्र 'MONEY SMART' या सदरातील सर्व लेखातुन व्यक्त झालेले विचार / अनुमाने यांना कृपया गुंतवणुकीच्या संदर्भात सल्ला किंवा शिफारस समजू नये ही विनंती.**

आपण या सदरातील पहिल्या लेखात १८ ते २५ या वयोगटातील आर्थिक विषयक गरजा, आशा, अपेक्षा याबद्दल थोडक्यात माहिती घेऊया.

आपल्यापैकी अनेक जणांनी येव्हाना महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून नियमित अर्थप्राप्तीसाठी नोकरी/धंदा/उद्योग सुरु केला असेल असे गृहीत धरूयात.मात्र दुसरीकडे तितकीच महत्त्वाची अशी सर्व समावेशक आर्थिक साक्षरता आपण प्राप्त केली आहे असे वाटते आहे का? नियमित व समाधानकारक अर्थ प्राप्तीसाठी प्रचंड श्रम व वेळ खर्च करावाच लागतो मात्र मिळालेला पैसा खर्च करण्यासाठी ठरलेल्या प्रमाणात प्रथम बचत करून अक्कल, हुशारी वापरून योग्य प्रकारे नियमितपणे गुंतवणे अत्यंत जरुरीचे आहे. अशा तऱ्हेने हळूहळू पण भविष्यात निश्चितपणे आपण आपले ध्येय गाठू शकतो मात्र हे वाटते तितके सहज व सोपे नाही यासाठी प्रथम स्वत:ला प्रबळ इच्छाशक्ती, नवनवीन ज्ञान मिळवण्याची आस, योग्य व्यक्तीकडून वेळेवर मिळणारे शैक्षणिक मार्गदर्शन अशा सर्व घटकांची समतोल जरुरी



असतो. खरे म्हणजे हा एक आयुष्यभर चालणारा अखंड प्रवास असतो. विविध वयोगटातील व्यक्तींना जीवनाच्या टप्प्यात आर्थिक बाबींशी निगडित अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांना तोंड देण्याची वेळ येत असते.त्यासाठी आपण सदैव 'तयार' अशा अवस्थेत असायला हवे. सांप्रतच्या तरुण पिढी पुढे भविष्यात एक विचित्र अशी परिस्थिती उभी ठाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. ती म्हणजे त्यांचे सरासरी आयुर्मान उत्तम आरोग्यदायी आहार व औषधोपचार उपलब्ध असल्यामुळे बरेच जास्ती म्हणजे अगदी ९० + असे सुद्धा असू शकेल. मात्र त्यांची नोकरी, धंदा, उद्योग करून नियमित अर्थप्राप्ती करण्याचा काळ कदाचित अपेक्षेपेक्षा कमी होऊ शकेल. अपरिहार्य अशा नियंत्रित/ अनियंत्रित कारणांमुळे उदा. शारिरीक व्याधी, दैनंदिन कामकाजातील कष्ट व ताणतणाव होणाऱ्या नित्यबदलांशी जुळवून न घेता येणे, घसरणारे सामाजिक सौहार्द इ. अनेक कारणांने घेण्यात येणारी स्वेच्छानिवृत्ती अगर देण्यात येणारी सक्तीची सेवानिवृत्ती. मात्र असे घेण्याची शक्यता असल्यामुळे कमाईच्या जीवन काळातच 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे उदास विचारे वेच करी' या संत तुकाराम महाराजांच्या सुप्रसिद्ध उक्तीचे खऱ्या अर्थाने स्मरण व नित्यआचरण करावे हे उत्तम आणि हे सर्व व्यवस्थित होण्यासाठी समग्र अर्थसाक्षरता शक्य तितक्या लवकर तरुण वयातच योग्य अशा मार्गदर्शकाकडून घेणे आवश्यक असेल कारण तरुण वयातच नियमित बचत व गुंतवणूक सुरू करून पुढे ही चांगली सवय कायम ठेवल्यास शुंर्ग्मैत इंदैाी ध ण्दस्ज्दल्ह्गहु चा अत्यंत फायदेशीर असा आकर्षक लाभ निश्चितच होतो.यासंदर्भात 'आम्ही पार्लेकर' काहीतरी ठोस करण्याच्या विचारात आहेत त्याचा तपशील लवकरच जाहीर करू. धन्यवाद!



**प्रकाश जोशी**
मो. ९९२०३३४७६२

## गौरी पाठारे यांची 'गानसरस्वती' पुरस्कारासाठी निवड

१० मार्च २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता डीएमसीसी सभागृहात दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्राचा २०२३ सालचा 'गानसरस्वती' हा



पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. या पुरस्कारासाठी विख्यात गायिका गौरी पाठारे यांची निवड झाली आहे. गानसरस्वती पद्मविभूषण किशोरी आमोणकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा वार्षिक पुरस्कार त्यांचे ज्येष्ठ शिष्य डॉ. अरुण द्रविड यांनी प्रायोजित केला आहे.

५० वर्षांखालील हिंदुस्थानी शास्त्रीय गायकाला दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. एक लाख रुपये आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार सोहळा आणि त्यानंतर गौरी पाठारे यांची ९० मिनिटांची छोटीशी मैफल होणार आहे.

गौरी पाठारे यांना आतापर्यंत सूरमणी पुरस्कार, पं. भीमसेन जोशी यांच्या स्मरणार्थ 'स्वरभास्कर' पुरस्कार, श्री सीताराम दीक्षित पुरस्कार, आदित्य विक्रम बिर्ला 'कला किरण पुरस्कार' असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.





अमृतधारा
हाऊसिंग कॉम्प्लेक्स
2 BHK HOMES

नाशिक शहराची
नवीन ओळख



25+ ॲमेनिटीज

**रवि महाजन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स** सादर करीत आहेत बदलत्या नाशिक शहरातील भव्य दिव्य गृहप्रकल्प **'अमृतधारा'**!

25 पेक्षा अधिक ॲमेनिटीज असणाऱ्या ह्या गृहप्रकल्पात आहेत तुमच्या मनाला भावतील व तुमच्या बजेट मध्येही बसतील अशी सुनियोजित 2 बी.एच.के. घरे. तेव्हा आजच अमृतधाराला भेट द्या आणि लगेच बुक करा तुमच्या सुखाचा पत्ता.

2 BHK HOMES

| ELEGANT+ | CLASSIC | LUXURIA |
|---|---|---|
| 40.50 L* | 43.13 L* | 50.80 L* |

*सर्व करांसहित

ही किंमत मर्यादित कालावधीसाठी

सोबत आनंद देणाऱ्या 25+ ॲमेनिटीज

स्विमिंग पूल | क्लब हाऊस | मल्टिपर्पज कोर्ट | डिझायनर लॉबी | ॲम्फिथिएटर | नेट क्रिकेट | चिल्ड्रन्स प्ले एरिया | पार्टी लॉन | ग्रीन जिम | गेटेड कम्युनिटी | सिक्युरीटी

साईट : सर्वे. नं. 82, राजसारथी सोसायटी जवळ, इंदिरानगर, नाशिक | 7304 7304 83

RAVI MAHAJAN
BUILDERS & DEVELOPERS
सुख समृद्धीच्या चार भिंती, प्रत्येकासाठी
www.ravimahajan.com

ऑफिस : 113 ते 116,
द प्रेसिडेन्सी, जुना आग्रा रोड,
गडकरी चौक, कालिका मंदिर
जवळ, नाशिक - 2.

Project approved by
SBI | HDFC HOME LOANS | ICICI Bank Home Loans | Bank of Baroda

Member of CREDAI NASHIK METRO

P51600034501
P51600034278

# ‘या डोळ्यांची दोन पाखरे... ’

**नमस्कार मंडळी,**
**गेलं संपूर्ण वर्ष, आपण आपल्या मनातील, गळ्यातील, हिंदी गीतांचा आस्वाद घेतला. यावर्षी आपण आपल्या आवडत्या, गाजलेल्या, काळाच्या कसावर टिकलेल्या, मराठी गीतांचा आस्वाद घेणार आहोत. आपल्याला हे लिखाण कसं वाटतंय जरूर कळवा.**



मराठी चित्रपटांच्या सुवर्ण काळातील अलौकिक बुद्धिमत्ता त्यातले चित्रपट दिग्दर्शक म्हणजे राजाभाऊ परांजपे. त्या काळात मुख्यत: कौटुंबिक पट, सामाजिक पट, लावणी पट, यशस्वी होत असताना काहीतरी वेगळं करण्याच्या ध्यासातून त्यांनी सन १९६४ मध्ये एका रहस्यमय मराठी चित्रपटाची निर्मिती केली. नायिकेची दुहेरी भूमिका ही त्याकाळी नवीन कल्पना होती. मराठीतील हा रहस्यपट अफाट गाजला. या चित्रपटातील गाण्याबद्दल आज आपण बोलणार आहोत. चित्रपट आहे 'पाठलाग' आणि गाणं..'या डोळ्यांची दोन पाखरे..'

हे गाणं म्हणजे म्हटलं तर प्रेम गीत आहे, म्हटलं तर गूढ, गंभीर, विरही नायकाच्या मनातील दु:ख व्यक्त करणारं गीत. 'या डोळ्यांची दोन पाखरे फिरतील तुमच्या भोवती'.. मी शरीराने तुमच्या अवतीभवती नसले.. तरी माझे मन:चक्षु सदैव तुमच्या भोवती भिरभिरत राहतील.. जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी तुमचा पाठलाग करत राहतील. थोडक्यात, असेन मी नसेन मी.. पण तुमच्या ठायी माझी प्रीत सतत राहील, आपलं पती-पत्नीचं नातं अक्षय राहील. नायिकेच्या अस्तित्वाविषयीचं गूढ आणखी गडद करणारं गीत..

प्रसिद्ध कथा लेखक जयंत देवकुळे यांची 'आशा परत येते' ही कथा राजा परांजपे यांच्या वाचनात आली आणि त्यांना प्रचंड आवडली. कथेतील उत्तम चित्रपटाची बीजं जाणवली. त्यांनी तडक गदिमांना गाठले. गदिमांनी देखील पसंतीची मान डोलावल्यावर मग पटकथा, संवादाची जबाबदारी त्यांच्यावरच पडली. या सिनेमाला एक नैसर्गिक वेग होता. ज्या पत्नीचे अंत्यसंस्कार आपण स्वत: केले तीच पत्नी काही दिवसांनी समोर येऊन उभी राहते याला काय म्हणायचे ? काय असते यामागचे रहस्य ? खरंच तिचा मृत्यू झालेला असतो का ? नायक-नायिकेच्या मनातील आठवणी, संभ्रम आणि कोर्टातील प्रसंग यांची गुंफण म्हणजे हा चित्रपट. कोर्ट सीन्स, तिथले बारकावे, डावपेच, यांनी सिनेमा अत्यंत उत्कंठावर्धक रहस्यमय आणि रंगतदार बनला.

या चित्रपटात फक्त दोनच गाणी होती. आशा भोसले यांनी गायलेली. 'या डोळ्यांची दोन पाखरे' व 'नको मारुस हाक, मला घरच्यांचा धाक' संगीत दत्ता डावजेकर. या डोळ्यांची.. गाण्याचा किस्सा मोठा भारी आहे. चित्रीकरणाच्या वेळी गाणं तयार नव्हतं. म्हणजे गाणं लिहीलंच नव्हतं. हे गीत पार्श्वभूमीवर वाजवण्यात येणार असल्याने केवळ चालीच्या



धून वर चित्रीकरण पूर्ण केलं. पुढे गदिमांनी झालेलं शूटिंग पाहून शब्द लिहिले.. 'या डोळ्यांची दोन पाखरे.. फिरतील तुमच्या भवती..' या चित्रपटासाठी राजाभाऊंना नायिकेची दुहेरी भूमिका सीमा देव यांना द्यायची होती. पण तोवर सीमा देव, रमेश देव यांच्यासह लग्न बंधनात अडकल्या होत्या. रमेश चित्रपटात असतील तरच काम करेन असं त्यांनी ठरवलं होतं. त्यामुळे राजाभाऊंनी अगदी नवीन अभिनेत्रीला घ्यायचं ठरवलं. त्यावेळी अशोक ताटे त्यांचे सहाय्यक होते. त्यांची पत्नी, सुमन ताटे, हिला अभिनयाची आवड होती. एक-दोन छोटी कामं तिने केली होती. राजाभाऊंनी ठरवलं ही भूमिका सुमनलाच द्यायची. नायिकेचं फिल्मी नामकरण झालं 'भावना'. नायकाच्या भूमिकेत त्या काळचा रंगभूमीवरचा बादशहा, डॉक्टर काशिनाथ घाणेकर यांना घ्यायचं नक्की केलं. छायाचित्रकार दत्ता गोर्ले यांनी मराठी चित्रपटात प्रथमच झूम लेन्स चा वापर करून काही भाग शूट केला होता. त्यामुळे सिनेमाला एक उंची प्राप्त झाली. या चित्रपटाचे सर्व चित्रीकरण जयप्रभात स्टुडिओत पार पडले. सिनेमा पूर्ण झाला. रसिकांना बेफाम आवडला. महाराष्ट्र शासनाचे तब्बल सात पुरस्कार मिळालेच, शिवाय राष्ट्रीय पुरस्कारही या चित्रपटाने पटकावला. नंतर राज खोसला यांनी या चित्रपटाचे अधिकार घेऊन १९६६ साली याच कथानकावर 'मेरा साया' हा हिंदी चित्रपट बनवला. त्यात या सिनेमातील 'या डोळ्यांची दोन पाखरे..' च्या जागी गाणं होतं 'तू जहां जहां चलेगा, मेरा साया साथ होगा..' आणि 'नको मारुस हाक' च्या जागी गाणं होतं .' झुमका गिरा रे.. बरेली के बजार में.' आज 'पाठलाग' ची आठवण पुसट झाली आहे. पण मेरा साया मात्र लगेच आठवला जातो.





**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

# दायित्व समितीचे ‘लिटल वॉरियर्स’ आणि ‘मेरी समॅरिटन्स’ शिबिरांसह सातत्यपूर्वक योगदान

दायित्व ही SVKM'S डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी स्थापन केलेली एक सामाजिक संवेदनशील समिती आहे. नावाप्रमाणेच दायित्व ही एक जबाबदारी आहे. 'दायित्व' ही समिती अनेक स्वयंसेवकांसह वर्षभर समाजकार्य राबवते.

या समितीने १८ डिसेंबर २०२३ रोजी सेंट ज्युड्स इंडिया चाइल्डकेअर टाटा मेमोरियल,




शिवडी येथे 'लिटल वॉरियर्स' हे शिबिर आयोजित केले होते. समितीच्या सदस्यांना कर्करोगग्रस्त शूर मुलांशी संपर्क साधण्याची संधी मिळाली. जवळपास ४५ मुले तिथे उपस्थित होती. त्यांचा उत्साह वाढवणे, त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणणे आणि ते खरे योद्धे आहेत याची त्यांना जाणीव करून देणे यावर या कार्यक्रमाचा भर होता. या समितीने मुलांसाठी गायन, ओरिगामी आणि खेळ यांसारख्या विविध मजेदार कार्यक्रम आयोजित केले होते. सदस्यांनी मुलांच्या क्रिएटिव्ह अभिव्यक्तीसाठी डायरी, ड्रॉइंग बुक्स आणि क्रेयॉन अश्या भेट वस्तू दिल्या. त्यांचे पोषण आणि आरोग्य वाढवण्यासाठी ५० केळी आणि २५ किलो संत्री यांसारखी फळे वाटली. कर्करोगग्रस्त मुलांनी सभासदांना फुले व बुकमार्क्स देऊन त्यांचे प्रेम व्यक्त करून सकारात्मकतेने कार्यक्रमाची सांगता केली .

याचप्रमाणे दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी दायित्व समितीने मातृभूमी स्कूल, जानुपाडा, कांदिवली पूर्व येथे 'मेरी समॅरिटन्स' हे शिबिर आयोजित केले होते. आदिवासी पाड्यातील आदिवासी मुलांसोबत नाताळ साजरा करून त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

समितीच्या सदस्यांनी नाताळसाठी शाळा सुशोभित केली आणि मुलांसाठी मुखवटा बनवणे, टॅटू पेंटिंग, नृत्य यांसारख्या विविध मनोरंजक उपक्रमांचे आयोजन केले. सुमारे ५० ब्लँकेट्स, क्रेयॉन आणि इतर स्टेशनरी भेटवस्तूं दिल्या.









# The Land of Unicorns

## Exploring Start up -An untapped assets class

A largely accepted definition of start-up is a relatively new company that is not listed on stock exchanges. It operates in an agile and flexible manner, experiences rapid growth, and has a significant potential for further expansion. Start-ups can range from small ventures like cafes at educational institutes to larger entities like Flipkart or Swiggy, which are currently valued at over 10 billion USD. So are all the 10 billion worth entities, start ups? Zomato and Swiggy exist in the same business space and are similarsized companies, yet Zomato is not a start-up as they are listed on the exchanges where as Swiggy is, since it is yet to be listed on any of the exchanges (National or International).


Traditionally, there were two primary stakeholders in the domain of start- ups: The founders and The Investors. Many of you must have heard of the concept of Shark Tank. The 'Sharks' represent the investors, and the ideas that they invest in are the 'start-ups' (Founders). When the founders start their journey, they aspire to be a 'Unicorn' i.e. a start-up with a valuation of $1 billion one day. However many good ideas die due to lack of funding and many investors lose money by investing in sub-optimal teams and ideas. To bridge the gap, a third group of stakeholders has emerged— 'The Researchers'. They contribute to both the stakeholders and ensure that the success rate of the whole ecosystem goes up.

Now let us look at how and why this asset class is enticing to the investors vis-a-vis the traditional investment options. To understand the difference better, let us look at the ten-year returns oninvestmentfor the different asset classes.

1. Gold: 9% (LBMA Gold Price Index)
2. Equities: 15% (Sensex TRI Benchmark returns)
3. Debt: 8%3 (Crisil Medium duration debt Index)

   Vs

4. Start-ups: 27% 4 (Venture Capitalists Representative Sample)







As per National Investment Promotion and Facilitation Agency and other researchers, the number of unicorns in India is on the rise

- 2021: 52
- 2023: 109
- 2025: 250 (expected unicorns)

Bharat is the third-largest start-up ecosystem globally, and in the coming decade, we are poised to be the second-largest. This is a right time to invest in this amazing land of unicorns. Majority of the start-ups fail and the key to invest in this asset class is to identify the right start-ups, invest in themat fair valuations,and then create an exit opportunity to gain optimum returns.

We analyzed a pool of 10760 start-ups in the last four years and after multiple rounds of filtration, we invested in 170 deals. If an investor randomly invests in 20 ideas out of the total pool of 10760, his/her win-loss could be 3-17 where as randomly investing in any 20 of the 170 selected start-ups will have a win-loss of 17-3. Flipping the odds is precisely the value-add that the researcher brings to the table. We have achieved 46% CAGR on the total deal portfolio in the last 55 months including 6% failed start-ups in the portfolio.

There are 899 Minicorns ($1 Million valuation) in India, and the time is right to invest in these companies as they embark on the Unicorn journey.

Has this article sparked your curiosity? Does 8%, 9%, 15% vs 27% excite you as returns on investment?Our research can assist you in beginning your investment journey in this fascinating asset class - The Land of Unicorns.

For HNV Consulting
Queries :- connect@hnvconsulting.com




Chaitanya Vinod
8460527316

Dr. Madhavi Pethe
9869164100

GOLDEN GATE TO IIT

"Making your dreams come true since 2005"

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals**: Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice**: Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development**: Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch — Our Top Scorers : 2019 Batch



Abhishek Mungekar IIT Gandhinagar | Anokhi Mehta IIT Bombay | Mihir Dharap IIT Palakkad | Shreyas Nadkarni IIT Bombay | Om Prabhu IIT Bombay | Atharva Varde IIT Guwahati | Omkar Nadkarni IIT Madras

Our Faculty



Prof. Vinayak Antarkar B.Tech IIT Bombay — Mathematics
Prof. Manoj Karmarkar M.Tech IIT Bombay, Prof. Indraneel Naik M.Tech NIT Trichy — Physics
Dr. U.R. Kapadi Ph.D. IIT Bombay, Prof. Sudhanshu Mishra B.Tech NIT Rourkela — Chemistry

Contact: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
Address: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

# स्वरदीप उत्सव २०२४

'स्वरदीप म्युझिक अॅकॅडमी' (फाउंडेड बाय दिपाली कामत अग्रवाल) दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी २१ जानेवारी रोजी 'स्वरदीप म्युझिक अॅकॅडमी' चा 'स्वरदीप उत्सव' २०२४ मोठ्या उत्साहात केशवराव घैसास सभागृह येथे पार पडला. २०२४ हे स्वरदीप म्युझिक अॅकॅडमीचे हे १० वे वर्ष असल्यामुळे स्वरदीप कुटुंबासाठी हे एक महत्त्वाचं वर्ष ठरलं आहे. 'Student Talent Showcase Festival' म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. या उत्सवात यावर्षी जवळजवळ ४ ते ८० वयोगटातील ११० विद्यार्थ्यांनी प्रोफेशनल म्युजिशियन सोबत आपले गाणे सादर केले. मुंबईतील वेगवेगळ्या विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. तसेच बाहेरगावच्या काही विद्यार्थ्यांनी देखील हजेरी लावली. या उत्सवाला ज्ञानेश चांदेकर आणि अनिता चांदेकर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. स्वरदीप म्युझिक अॅकॅडमीचे १० वे वर्ष असल्याने विद्यार्थ्यांनी दिपाली कामत अग्रवाल यांचा सत्कार केला. संगित विशारद दिपाली आणि विद्यार्थ्यांनी मिळून 'मिले सुर मेरा' या सुमधूर गाण्याने कार्यक्रमाची सांगता केली.






दिपाली कामत अग्रवाल या 'स्वरदीप म्युझिक अॅकॅडमी' च्या फाउंडर असून त्यांनी संगीत विशारद ही पदवी घेतली आहे. त्यांना कॉलेज मध्ये असताना लेट कॅप्टन विनायक गोरे आय. सी. आय. सी. आय. अवॉर्ड्स, Ojaswini Young Women Achiever's Award, २०१९ मध्ये Artist Of the year Award, २०२० आणि २०२३ मध्ये रंगोली अवॉर्ड्स असे अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. याचबरोबर दिपाली यांनी आजवर टीव्ही सिरियल्स करता गाणी, तसंच छोट्यांसाठी बालगीतं गायली आहेत, लुईस बँक्स, कौशल इनामदार यांसारख्या दिग्गजांबरोबर, तसंच बाल सरगम, कीप अलाइव्ह, उत्तुंग अशा म्युझिकल ग्रुप्स बरोबर काम केलं आहे. स्वरदीप म्युझिक अॅकॅडमी मध्ये आतापर्यंत १५०० मुलांनी शिक्षण घेतलं असून अंधेरी व विलेपार्ले येथे त्यांच्या शाखा आहेत. Mumbai Anthem या मुंबई सन्मान गीतासाठी आवाज दिला आहे.



# इस्त्रोचा 'स्टेलार' परफॉर्मन्स !

आपण जेव्हा Happy New Year च्या मूडमध्ये होतो आणि वर्षाच्या पहिल्या दिवशी सुट्टी असल्याने ताणून झोपेत होतो. तेव्हा इस्त्रोच्या टीमने मात्र डोळ्यात तेल घालून रात्रभर जागून सकाळी- सकाळी एक रॉकेट लॉन्च केले पण ! आपला दिवस उजाडल्यावर ह्याबाबत बातमी वाचली असेलच. XPOSAT नावाचा एक उपग्रह अवकाशात सोडला हे उडान होऊन आठवडा उलटत नाही तर सप्टेंबर मध्ये सोडलेले आदित्य हे सूर्य यान आपल्या पूर्वनियोजित स्थानावर (L1) स्थानापन्न होते. अशी ही एका आठवड्यात दोन स्टेलर परफॉर्मन्स देऊन इस्रो ने



राष्ट्रीय व जागतिक स्तरावर आपले उद्दिष्ट सादर केले.

XPOSAT हा उपग्रह नसून एका प्रकारची खगोलीय वेधशाळा आहे. आपल्या गॅलेक्सी मधील ताऱ्यांचा अभ्यास करणार आहे.

XPOSAT म्हणजे X-ray POlarimeter Satellite. आपल्या आकाशगंगेतील अनेक तारे इतर आकाशगंगा (गॅलेक्सिज) आणि ब्लॅक होल्स, किंवा भरपूर प्रमाणात एक्स-रे उत्सर्जित करीत असतात. अशाच एक्स-रे स्त्रोतांचा



अभ्यास करणे हा या XPOSAT चा मुख्य उद्देश आहे. XPOSAT शब्दाची फोड करून सांगतो म्हणजे तुम्हाला समजणे सोपे जाईल. एक्स-रे बद्दल तुम्हाला माहीत असेलच कारण कोणत्या ना कोणत्या कारणासाठी आपण आपला एक्स-रे काढतो. ही एक्स-रे म्हणजे एका प्रकारची तरंगे आहेत ज्यांना कमी वेव्हलेंथ असते पण ऊर्जा मात्र कमालीची असते.

Polarisation याचा वैज्ञानिक अर्थ वेगळा आहे. भौतिक शास्त्रात Polarisation हा प्रकाश किरणांना 'वठणीवर' आणायचे कार्य करतो. म्हणजेच जेव्हा तुम्ही एखाद्या 'Polarised' चष्म्यातून पाहता तेव्हा हा गॉगल unwanted reflection 'Filter' करून तुम्हाला एक क्लिअर इमेज दाखवतो. जेणेकरून डोळ्यांना उन्हाचा त्रास होत नाही.हेच प्रिन्सिपल वापरून XPOSAT खगोलीय वस्तूंचा एक्स-रे किरणामार्फत अभ्यास करेल जेणेकरून ताऱ्यांच्या निरनिराळ्या गॅलेक्सिज आणि ब्लॅक होल्स बद्दल अजून माहिती मिळेल. POLIX आणि XSPECT ही दोन पेलोड्स वापरून आपण ह्या मिशनचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

दुसरं आहे बहुचर्चित आदित्य L1. आपल्या सूर्यनारायणाचा अभ्यास करण्यासाठी घडलेलं हे सूर्ययान. खरंतर २००८ साली ह्या मिशनची सुरुवात झाली होती पण निधीचा अभाव काही तांत्रिक बाबी व इतर मिशन्स मुळे हे मिशन लांबणीवर पडले.२०१६ ला केंद्र सरकारने निधीमध्ये कमालीची वाढ करून सूर्याचा पूर्णपणे अभ्यास करणारी एक वेधशाळा तयार करण्याचे आवाहन केले. ६ जानेवारीला हे सूर्य आपल्या नियोजित जागेवर म्हणजे Lagrangian Point (L1) जाऊन पोहोचले. हा पॉईंट पृथ्वी व सूर्य यांच्या एका रेषेत येत असल्याने येथे एखादे यान सोडले तर ते यान कायम सूर्याच्या प्रकाशात नाहून निघेल किंवा त्या यांनाच कायम सूर्यदर्शन



होत राहील. अर्थातच अनेकांचा असा गैरसमज झाला होता की हे यान जळणार तर नाही ना ? तर असे काहीही होणार नाही, कारण आदित्य यान पृथ्वीपासून जरी १५ किलोमीटर अंतरावर असेल तरीही आदित्य व सूर्य यातील अंतर हे पृथ्वी, सूर्य अंतराच्या जवळपास १०० पटीने आहे. सूर्याच्या विविध वातावरणाचा अभ्यास करणे, सौर ज्वालांचा आणि सूर्याच्या अफाट चुंबकीय शक्तीचा, L1 पाशी होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

सर्वात मुख्य म्हणजे सूर्याचा सर्वात बाहेरील वातावरण ज्या सोलार करुणा किंवा सूर्यप्रभा मंडळ म्हणतात त्या ठिकाणी तापमान प्रचंड उष्ण असते. जवळपास दहा लाख अंश सेल्सियस तर ह्या अति उष्ण पणाचे कारण शोधणे हे त्यातील महत्त्वाचे उद्दिष्ट. अशा ह्या दोन तारांकित मिशनमुळे इसरो ने ग्रह चंद्र यांच्या पलीकडे जाऊन विश्वाच्या संशोधनात आपले अमूल्य योगदान देऊन संपूर्ण जगात आपली स्पेस निर्माण करत आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.



अंबरीश पवार
९६१९१९४६४०

# छंद - आनंद

साधारणत: आयुष्यात प्रत्येकाला कुठला ना कुठला छंद असतो. कोणाला नृत्य करायला आवडत, कोणाला गाण म्हणायला, किंवा कोणाला कुठल्यातरी खेळात (Sports) मध्ये रस असतो. कोणाला चित्र काढायला आवडत



पण प्रत्येकाला त्यांची आवड, छंद पुढे घेऊन जाण्याची संधी, प्रोत्साहन मिळतेच अस नाही.

बऱ्याचदा अभ्यास, टक्केवारी, जबाबदाऱ्या, पैसा या सगळ्याच्या घोळक्यात आपण आपला छंद कुठेतरी हरवून बसतो, आणि बरेचदा तो विस्मरणातही जातो. पण मग कधीतरी आयुष्याच्या एखाद्या वळणावर हुलकावणी देऊन गेलेला हा छंद अवचित असा समोर येतो आणि आपल बोट हळूवारपणे धरून आपल्या सोबतीला येतो. त्यावेळी मात्र त्याला अलगद आपलस करता आल पाहिजे.

मी सुध्दा माझा छंद 'चित्रकला असाच मागे सोडला होता, कधीतरी अधूनमधून काहीतरी केलं जायच पण गांभीर्याने घेतल जात नव्हत. पण मग आयुष्याच्या एका टप्प्यावर खरतर मध्यावर म्हणता येईल. खूप मागे सोडलेला माझा हा छंद, माझी चित्रकला मी पुन्हा चालू केली आणि आज तोच माझा व्यवसाय बनवून, एक व्यावसायिक चित्रकार म्हणून स्वत:ची ओळख बनवू शकले याचा मला खूप आनंद आहे.

माझ्यासारखे अजूनही कितीतरी जण असतील जे वयाच्या अशा टप्प्यात पोहोचले असतील की सर्व जबाबदाऱ्या तर पार पडल्यात पण हे सर्व करताना स्वत:ला काय हवं होतं किंवा करायचं होतं हा आत्मशोध घेणं राहूनच गेलय.

'कौशल्य' आणि 'कला' या दोन्हींमध्ये काय फरक आहे? जेव्हा तुम्ही मेहनतीने सरावाने एखाद्या गोष्टीत पारंगत होता तेव्हा ते तुम्ही प्राप्त केलेलं 'कौशल्य' असतं आणि जेव्हा ह्या कौशल्याला तुम्ही अजून सुंदर करून सजवून त्या गोष्टीकडे लोकांना आकर्षित करू बघता तेव्हा ती गोष्ट कला (ART) होते.

आपली कला हे आपले विचार, कल्पना आणि स्वत:ला व्यक्त करण्याचं एक प्रभावी माध्यम आहे. जसा कवितांच्या काव्यातून कवी, लिखाणाच्या माध्यमातून लेखक स्वत:ला व्यक्त करत असतो अगदी तसाच चित्रकार त्याच्या चित्रातून व्यक्त होत असतो. तुमची चित्र हा तुमच्या मनाचा आरसा असतो.

पण सर्वात आधी आपण 'आपल्याला काय हवय?' हा प्रश्न स्वत:ला विचारला पाहिजे. तसंच तुमची कला ही तुम्हाला 'छंद' म्हणून जोपासायची आहे की त्यात व्यावसायिक दृष्ट्या पुढे जायचं आहे. हे पहिलं ठरवलं पाहिजे. पण काहीही झालं तरी तुमची कलेविषयीची ओढ, पॅशन खूप महत्त्वाची आहे आणि आपण कुठूनही कला शिकलो तरी शेवटी मेहनत आणि सातत्याने सराव याला पर्याय नाही. कोणत्याही गोष्टीत प्राविण्य मिळवण्यासाठी चिकाटी , कठोर परिश्रम आणि जिद्द खूप महत्त्वाची असते.

कलेच्या माध्यमातून व्यक्त होतानाच कला आपल्याला आत्मिक समाधान, आत्मविश्वास आणि स्वत:चा सन्मान करायलाही शिकवते. तसेच ती स्ट्रेस बस्टर ही आहेच. जेव्हा आपण आपल्या कलेत रमतो तेव्हा सर्व चिंता ताण विसरून त्यात रममाण होतो. तसेच त्यामुळे आपली वेगवेगळ्या क्षेत्रातल्या लोकांशी ओळख होते, मैत्री होते आणि आपण अनुभवांनी अधिक समृद्ध होत जातो. जेव्हा तुमची कला तुमचा व्यवसाय होते तेव्हा त्यातून मिळणारं समाधान खूप आनंददायी असतं.



माणसाचा व्यक्तीमत्व हे 'मन' आणि 'शरीर' यांचा संयोग आहे. जर आपलं मन तणावाखाली असेल तर शरीरावर त्याचा ताण दिसतो आणि जर शरीर आजारी असेल तर मनावर ताण येतो. त्यावेळी हीच आपली कला मन आणि शरीर यांच्या समन्वय साधायला मदत करते. जेव्हा आपली सर्व ऊर्जा, एनर्जी आपण आपल्या कलेत एकत्रित आणतो त्यावेळी मन आणि शरीरही त्यात पूर्णपणे सामील होतं.

चित्रकला आपल्याला आपल्या स्वप्नांमध्ये नकळत का होईना पण वेगवेगळे रंग भरायला शिकवते. आणि याच चित्रकलेचे वेगवेगळे रंग आणि ढग 'आम्ही पार्लेकर' च्या पुढील अंकांमध्ये तुम्हाला वाचन स्वरूपात अनुभवायला मिळतील.



प्रज्ञा राजे
९८२१२५९८८७

# पार्ल्यातील वृक्षवैविध्य

## निम्फिफोलीया

आज आपण पार्ल्यातीलच काय पण महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवरील बहुतेक एकमेव असलेल्या वृक्षाची ओळख करून घेणार आहोत. हा आहे Hernandia nymphaiefolia.

**Family Hernandiaceae**

हा सहसा वालुकामय समुद्रकिनाऱ्यावर किंवा समुद्राजवळच्या कांदळवनांच्या आसपास




आढळणारा वृक्ष. ह्याचा बीजप्रसार वटवाघळे अथवा समुद्राच्या लाटांमुळे होतो. कोवळी पाने खूप चमकणारी असतात. ह्याच्या पानांचे देठ पानाच्या पृष्ठभागाच्या कडेला जोडलेले नसून पानाच्या खालच्या पृष्ठभागाला जोडलेले (कमळाच्या पानांप्रमाणे) असतात व म्हणूनच नांव निम्फिफोलीया ( कमळ सदृश पानांचा)असे आहे.

शोभिवंत गुच्छात येणारी फुले आकाराने लहान, हिरवट पांढरी व सुगंधी असतात. फळे पांढरी अथवा गुलाबी असतात. लांबून ती उन्हाळ्यात मिळणाऱ्या जांबच्या फळांसारखी दिसतात. फळे पोकळ असून खालच्या बाजूने त्यांना एक मोठे भोक असते. आत देठाला चिकटलेले मोठे काळे बी असते. हे सर्व रुपडे एखाद्या चिनी आकाशकंदीलासारखे दिसते. म्हणूनच हा चायनीज लँटर्न ट्री म्हणून देखील ओळखला जातो.

बीयांना छान पॉलीश करून त्याचे अलंकार करतात.

पाने, फळे व खोडाचा उपयोग सौम्य रेचक म्हणून होतो. कोवळ्या पानांचा रस शरीरावरील नको असलेले केस कमी करण्यासाठी करतात. लाकूड हलके असल्यामुळे त्यापासून होडीचे विविध भाग, तसेच मासेमारीची अवजारे, जाळ्यांना लावण्याचे फ्लोटस् अथवा लाकडी अवजारे व खेळणी वगैरे देखिल बनवतात.

मी काही वर्षांपूर्वी अंदमान बेटावर हा वृक्ष बघीतला.

लांबून जांब वाटले पण जवळ गेल्यावर फळे वेगळी व मजेशीर आहेत हे लक्षात आले. पण वृक्षाची ओळख पटत नव्हती. बरीच छायाचित्र व फळे बरोबर आणली. शोध घेतल्यावर नांव सापडले.

मग त्या बिया कुंडीत रूजत घातल्या.पण तेव्हा त्या रुजल्या नाहीत. मी देखील त्या विसरलो होतो पण सहा सात महिन्यांनंतर अचानक एक जोरदार रोप उगवले. महीन्याभराने पानांनी ओळखपटवली.

तीन वर्ष कुंडीत वाढवून मग मी तो सावरकर केंद्राच्या आवारात लावला. आता तो चांगला वाढत आहे. अजून फुले-फळे आलेली नाहीत.

ऑस्ट्रेलिया, आशियातील दक्षिण पूर्वेकडील बेटे, अंदमान-निकोबार व भारताचा पूर्व किनारा इथे हा सापडतो. पण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर हा आढळल्याची नोंद मला तरी दिसलेली नाही.



**श्रीकांत सावरकर**
९२२३३१४९०९

# 'CHAMPION'S ZONE' विशेष मुलांच्या खेळाडू वृत्तीला भरारी

२९ नोव्हेंबर २०२३ या दिवशी साठ्ये कॉलेजच्या टर्फ मैदानावर रसायनशास्त्र विषयाचा तृतीय वर्षाचा विद्यार्थी, श्री. अभिषेक झा याने 'चॅम्पियनस् झोन' (ण्र्पेस्न्दहे ँदहा) या त्याच्या टर्फ मॅनेजमेंट विषयक उद्योग संकल्पनेला ओळख मिळावी या हेतूने विशेष



सक्षम विद्यार्थ्यांसाठी 'खेळ ऊर्जा' हे अनोखे संमेलन आयोजित केले होते. अभिषेकचे चॅम्पियनस् झोन हे एुीी-ळ्ज शाळा आणि महाविद्यालयांमधील टर्फ मैदानाचे व्यवस्थापन पाहते, क्रीडा स्पर्धांचे आयोजन करते आणि खेळातील वंचित किंवा कमी प्राधान्य मिळणारा वर्ग म्हणजे मुली, महिला आणि विशेष अपंग मुले यांना चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचे चॅम्पियनस् झोन उद्दिष्ट आहे.

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या घ्रेूलू दर्शीह्रीसहू या मॅनेजमेंट कॉलेजने णह्री दि



ह्रीजीहालेप्र्जेहि घ्हहदर्नूग्दह (ण्र्धं) मध्ये आपल्या संकल्पनेसाठी मार्गदर्शन घेत असलेल्या अभिषेकने विशेष सक्षम



विद्यार्थ्यांसाठी असलेल्या १४ शाळांमधून ५०० विद्यार्थ्यांना या 'खेळ ऊर्जा' साठी एकत्र आणले. संस्थेचे अध्यक्ष श्री. अनिल गानू सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आमदार श्री. पराग अळवणी तर विशेष अतिथी म्हणून श्रीमती प्रिमला हिंगोराणी या ७९ वर्षी सुद्धा मॅरॅथॉन धावणाऱ्या धावपटू उपस्थित होत्या.

अंध खेळाडूंच्या नेत्रदीपक क्रिकेटने 'खेळ ऊर्जा'चे सामने सुरू झाले. दिव्यदृष्टी असलेले खेळाडू आवाजाचा मागोवा घेत फलंदाजी



करताना तसेच अचूकपणे 'रन आऊट' करताना बघणे हे केवळ अवर्णनीय होते.

कर्णबधीर आणि मानसिक विकलांग विद्यार्थ्यांचे विविध खेळांचे व वेगवेगळ्या वयोगटांसाठीचे ५० च्या वर सामने सुसंवादात पार पडले. टर्फवर खेळताना आनंदून गेलेले निरागस आनंदी चेहरे हे आयोजकांना समाधान देत होते व सर्वांमध्ये अधिकाधिक उत्साह आणि ऊर्जा निर्माण करत होते. असा अभूतपूर्व सोहळा पार पडला तो अभिषेकच्या अथक परिश्रमामुळे, ण्र्धं मधून मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे तसेच त्याचे ६० विद्यार्थी स्वयंसेवक, ण्र्धं च्या प्रमुख सुकृता पेठे यांचे मार्गदर्शन आणि साठ्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे तसेच घ्रेूलू दर्शीह्रीसहू च्या प्रभारी संचालक डॉ. तेजश्री देशमुख यांचा पाठिंबा तसेच दोन्ही महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनापासून झालेल्या सहभागामुळे! या कार्यक्रमाला अनेक उदार संस्था व व्यक्तींनी आर्थिक पाठबळ दिले यामुळे असा कार्यक्रम शक्य झाला.

# नव वर्षात महिला संघ शाळेत 'अक्षरसरिता' च्या वाचन वर्गाची सुरुवात

सोमवार दिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी महिलासंघ मराठी माध्यमाच्या शाळेत 'अक्षरसरिता' अंतर्गत इयत्ता सातवीच्या दोन वर्गांमध्ये 'अक्षरसरिता' चे वाचन वर्ग सुरू करण्यात आले आहेत.



या अनौपचारिक सोहळ्याच्या उद्घाटना दिवशी शाळेच्या मुख्याध्यापिका गौरी सावंत ह्यांनी मुलांना वाचनाचे महत्व सांगितले तर 'अक्षरसरिता' च्या डायरेक्टर शोभा बोंद्रे ह्यांनी कविता वाचन करून मुलांना थेट पुस्तकांच्या जगात नेले.

पुणे परिसरात 'अक्षरसरिता' तर्फे दर आठवड्याला विविध शाळांमध्ये मिळून एकूण ४० वाचन वर्ग चालविले जातात.

आता नविन वर्षाच्या सुरुवातीला ही संख्या वाढून ४२ झाली आहे. आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटातील मुलांना अवांतर वाचनाचा भरपूर लाभ घेता यावा, हे 'अक्षरसरिता' चे प्रमुख उद्दिष्ट आहे.

त्यासाठी म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या तशाच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये 'वाचनाचा तास' हा उपक्रम गेली बारा वर्षे 'अक्षरसरिता' च्या माध्यमातून राबवला जात आहे.



# आईच्या गावात मराठीत बोल

थ्री इडियट्स चित्रपटाने प्रचंड लोकप्रियता मिळवली होती आणि त्या चित्रपटातला 'चतुर' म्हणजेच अभिनेता ओमी वैद्य खूप लोकप्रिय झाला. हाच 'चतुर' आता मराठी चित्रपटातून अभिनेता आणि दिग्दर्शक म्हणून आपल्या समोर येत आहे. चित्रपटाचे नाव सुद्धा एकदम भन्नाट आहे, 'आईच्या गावात मराठीत बोल'. याच महिन्यात हा चित्रपट प्रदर्शित होतो आहे.

चित्रपटाचा नायक, समर (ओमी वैद्य), परदेशात राहणारा एक खोडकर तरुण परिस्थितीच्या दबावामुळे लग्नासाठी सुयोग्य मराठी वधू




शोधण्याच्या आशेने भारताच्या प्रवासाला निघतो. तथापि, नशिबाप्रमाणे समरच्या आयुष्याला एक गमतीदार वळण लागते कारण त्याला या प्रवासात अनेक आनंददायक तसेच विलक्षण प्रसंगांचा सामना करावा लागतो.

हा प्रवास त्याला एक जीवनाच्या एका वेगळ्या वाटेवर नेऊन ठेवतो जिथे त्याल्या प्रेम, कौटुंबिक मूल्ये अशा अनेक गोष्टींचा अनुभव मिळतो.

'आईच्या गावात मराठीत बोल' या चित्रपटाची गाणी व्हिडिओ पॅलेस सादर करत आहे तर संगीत आणि पार्श्वसंगीत अविनाश विश्वजीत यांचे आहे. 'आईच्या गावात मराठीत बोल' या शीर्षक गीताचे धमाल बोल वैभव जोशी यांनी लिहीले आहेत, ठेका धरायला भाग पाडणाऱ्या या गीताला स्वप्निल बांदोडकर, विश्वजीत जोशी, मनीष राजगिरे आणि रोहित राऊत यांनी अस्सल मराठी आवाज दिला आहे. 'तू हवीशी' हे गाणे विश्वजीत जोशी यांनी लिहले आहेआहे. तर ऋषिकेश रानडे यांनी गायलेलं गाणं कॉमेडीची मेजवानी असलेल्या चित्रपटात सुद्धा रोमँटीक माहोल तयार करत आहे.ओमी वैद्य आणि अमृता हर्डीकर यांनी या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद लिहीले आहेत.ओमी म्हणतो, 'बऱ्याच दिवसांपासून मराठीत काम करण्याची इच्छा होती आणि माझे हे स्वप्न या चित्रपटाच्या निमित्ताने पूर्ण होत आहे.'

'आईच्या गावात मराठीत बोल' या चित्रपटात प्रमुख भूमिकेत ओमी वैद्य, संस्कृती बालगुडे, पार्थ भालेराव आहेत तसेच विद्याधर जोशी, इला भाटे, किशोरी शहाणे, उदय टिकेकर, अभिषेक देशमुख, सुप्रिया विनोद, नेहा कुलकर्णी, ओंकार थत्ते, ध्रुव दातार, सायली राजाध्यक्ष आणि सुधीर जोगळेकर यांच्या ही महत्त्वपूर्ण भूमिका पाहायला मिळणार आहेत.




# श्रीदेवी प्रसन्न

काही वेळा मराठी चित्रपटांची नावच उत्सुकता निर्माण करतात. असाच एक आगामी चित्रपट म्हणजे श्रीदेवी प्रसन्न. काय असेल या चित्रपटात?

गोष्ट आहे श्रीदेवी नावाच्या एका मुलीची. एका चित्रपट वेड्या कुटुंबातील मुलगी म्हणजे श्रीदेवी. तिच्या कुटुंबातील व्यक्तींची नावे देखील फिल्मी असतात. तर प्रसन्न हा लग्नाचं वय झालेला मुलगा आहे. योग्य वयात वेळेवर लग्न व्हायला पाहिजे, हा प्रसन्नच्या कुटुंबातील लोकांचा दृष्टिकोन. त्यामुळे प्रसन्नच्या पाठी 'लग्न कर, लग्न कर' असा आग्रह त्याच्या घरचे करत असतात. अशावेळी प्रसन्न आणि श्रीदेवी या दोघांची भेट एका मॅट्रिमोनियल संकेतस्थळावर होते. मग काय घडते हे तुम्हाला 'श्रीदेवी प्रसन्न' या चित्रपटातून बघायला मिळणार आहे.

टिप्स मराठी प्रस्तुत व राजकुमार तैरानी निर्मित श्रीदेवी प्रसन्न, चित्रपटाचा डिजिटल ट्रेलर प्रदर्शित झाला आहे.

विशाल विमल मोढवे दिग्दर्शित 'श्रीदेवी प्रसन्न' चित्रपट २ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. 'श्रीदेवी प्रसन्न' या चित्रपटात सई ताम्हणकर व सिद्धार्थ चांदेकर मुख्य भूमिकेत पाहायला मिळणार असून सुलभा आर्या या सईच्या फिल्मी आज्जीच्या भूमिकेत दिसणार आहेत त्याचबरोबर सिद्धार्थ बोडके, रसिका सुनील, संजय मोने, वंदना सरदेसाई, समीर खांडेकर,




आकांक्षा गाडे, रमाकांत डायमा, शुभांगी गोखले, राहुल पेठे, पल्लवी परांजपे, पूजा वानखेडे, सिद्धार्थ महाशब्दे, जियांश पराडे हे कलाकार देखील महत्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहेत. या चित्रपटाच्या लेखिका आदिती मोघे यांनी हा भन्नाट मनोरंजनपूर्ण चित्रपट लिहिला असून, मराठीतील सुप्रसिद्ध संगीतकार अमित राज यांनी यातील गाणी संगीतबद्ध केली आहेत.



**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# डी. एन. शिरूर बालकाश्रम ची आनोखी दिवाळी

प्रार्थना समाज संचालित डी. एन. शिरूर बालकाश्रम येथे गेली १५ वर्षे प्रत्येक सणाला वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. यावर्षी दिवळी निमित्त किल्ले, आकाश कंदील, भेटकार्ड बनवणे, रांगोळी स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन केले होते.

या आश्रमामध्ये एकूण ५५ मुलं राहत आहेत आणि मान्यता ६५ मुलांची आहे. ज्यांची ४ गटात मध्ये म्हणजेच गट एक :-राजा राम मोहन रॉय, गट दोन :- रामकृष्ण गोपाळ भांडारकर, गट तीन:- महादेव गोविंद रानडे, गट चार:- देवेंद्रनाथ ठाकूर अशी विभागणी केली आहे. यावर्षी दिवळी निमित्त चांद्रयानाच्या देखाव्याचा आकाशकंदील मुलांनी बनवला होता. सणानिमित्त आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धेत मुलं अतिशय उत्साहाने भाग घेतात तसेच मुलांचा उत्साह टिकून राहावा यासाठी स्पर्धेत भाग घेतलेल्या मुलांच्या गटाला मार्क दिले जातात. या स्पर्धेमधून मुलांच्या कलागुणांना वाव आणि प्रोत्साहन मिळते.









